**मेट्रो लाईन-३ प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या इमारतीमधील रहिवाशांच्या कृती समितीची दिनांक १६/०३/२०१५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

गिरगांव-कालबादेवी येथील मेट्रो लाईन-३ प्रकल्पामुळे बांधीत होणाऱ्या इमारतीमधील रहिवाशांच्या कृती समितीची बैठक दिनांक १६/०३/२०१५ रोजी प्राधिकरणाच्या नरिमन पॉईंट, सीआर-२ येथील कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत कृती समिती समवेत झालेल्या बैठकीचे इतिवृत्त खालील प्रमाणे : -

**१) कृती समितीच्या सदस्यांनी मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाची मार्गिका ही जे. एस. रोड ऐवजी महर्षी कर्वे रोड येथून घेऊन जाण्याबद्दल आग्रह धरला.**

- सदर मुद्यावर माहिती देत असतांना व्यवस्थापकीय संचालिका यांनी असे संबोधीत केले की, प्रकल्पाची आखणी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारामार्फत केल्यानंतर, तांत्रिकदृष्टया व सर्व सामान्य जनतेच्या हितार्थ असणाऱ्या मार्गिकेची निवड केली आहे. जन सुनावणी दरम्यान सुध्दा असाच प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर सदर मार्गिका ही महर्षी कर्वे रोड वरुन नेता येईल किंवा कसे याची पुन्हा तांत्रिक सल्लागारांमार्फत तपासणी करण्यात आली असून, महर्षी कर्वे रोड वरुन विविध अडचणीमुळे मार्गिका नेता येणार नाही असे सल्लागारांनी पुनर्तपासणीनंतर मत दिले. त्यामुळे मेट्रो प्रकल्पाची सद्य:स्थितीत असणारी मार्गिका ही बदलता येणार नाही.

**२) गिरगांव-काळबादेवी येथून मध्ये रेल्वे तसेच पश्चिम रेल्वेची स्थानके जवळच असल्यामुळे गिरगांव-काळबादेवीच्या रहिवाशांनी मेट्रो रेल्वे प्रकल्पाची गरज नाही असे कृती समितीने बैठकीत मांडले.**

- या मुद्याबाबत उत्तर देतांना व्यवस्थापकिय संचालिका यांनी असे सांगितले की, मेट्रो प्रकल्पाची आखणी ही शहरातील लोकसंख्या तसेच भविष्यात होणारी वाढ व सद्यस्थितीत नागरीकांना उपलब्ध असलेल्या, सार्वजनिक वहातुकीच्या सोयी लक्षात घेऊन पुढील किमान १०० वर्षासाठी करण्यात येते.

सदर मेट्रो लाईन-३ प्रकल्पाची आखणी या सर्व बाबींचा विचार करुन सार्वजनिक हितार्थ तयार करण्यात आली असून ती केवळ गिरगांव काळबादेवी पुरती मर्यादीत नसून संपूर्ण शहराच्या हिताची आहे. त्यामुळे सदर सार्वजनिक प्रकल्पांना विरोध न करता प्रकल्पामुळे होणाऱ्या पुनर्स्थापन / पुनर्विकास इतर संबंधी नागरीकांच्या काही समस्या व सुचना असल्यास त्या मांडणे योग्य होईल व त्यावर आवश्यक तो तोडगा काढण्याच्या पूर्ण प्रयत्न केला जाईल.

**३) गिरगाव-काळबादेवी येथील बाधीत कुटूंबियांचे त्याच ठिकाणी पुनर्वसन व्हावे.**

- या मुद्यावर व्यवस्थापकीय संचाललिका यांनी असे सांगितले की, मेट्रो प्रकल्पासाठी आवश्यक असणारी जागा ही फार थोडया प्रमाणात आहे व ती केवळ मेट्रो स्टेशनच्या एन्ट्री व एक्झीटसाठी, तसेच इतर अनुषंगिक कामासाठी आवश्यक आहे. मेट्रो प्रकल्पाला लागणारी जागा विचारात घेऊन

सर्व बाधीत इमारतींचा पुनर्विकास व तसेच बांधीत कुटूंबाचे पुनर्वसन त्याच ठिकाणी करता येईल किंवा कसे याबाबत तज्ञ सल्लागाराकडून आराखडा तयार करण्यात येईल व सदर आराखडा बाधीत कुटूंबांना विश्वासात घेऊन त्यास आवश्यक असणारी मंजूरीसाठी शासनास विनंती करण्यात येईल. व्यवस्थापकीय संचालिका यांनी असेही नमूद केले की, जोपर्यंत उपरोक्त नमूद कार्यवाही होत नाही तोपर्यंत गिरगांव-काळबादेवी येथील प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या कोणत्याही इमारतीचे निष्कासनाबाबतची कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही.

**४) गिरगांव-काळबादेवी येथील सर्व बाधीत रहिवाशांची पुनर्वसनादरम्यान तात्पुरती राहण्याची सोय (Transit) याच परिसरात व्हावी.**

- सदर मुद्यावर व्यवस्थापकीय संचालिका यांनी असे सांगितले की, उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तज्ञ सल्लागारांची नेमणूक करुन उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायाचा विचार केला जाईल. तसेच म्हाडा किंवा इतर शासकिय यंत्रणामार्फत विविध प्रकलांतर्गत जसे ३३७(७) व ३३(९), इत्यादी प्रकल्पांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या सदनिकांची मागणी या आधिच म्हाडा कार्यालयाकडे करण्यात आली आहे. अशा प्रकारे प्रकल्पामधील बाधीत कुटूंबांचे तात्पुरते पुनर्वसन त्याच क्षेत्रामध्ये साधरण ५०० ते १००० मीटीर परिसरामध्ये करण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल व शक्य न झाल्यास बांधीत कुटूंबांना घरभाडे उपलब्ध देण्याचा पर्याय लागू राहील.

**५) मेट्रो लाईन-३ विषयी तांत्रिक मुद्दे.**

- मेट्रो लाईन-३ प्रकल्पाबाबत काही तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्यात आले. जसे जमिनीची तपासणी करण्यासाठी घेण्यात आलेले बोअरवेल, खडकाची गुणवत्ता, प्रकल्पाची मार्गिका, वापरण्यात येणारे तंत्रज्ञान व तसेच सदर प्रकल्पाचा कामामुळे परिसरातील अस्तित्वात असणाऱ्या जुन्या इमारतीवर होणारे परिणाम याबाबत एमएमआरसीने पुरेसा अभ्यास केला आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आली. सदर मुद्दयाबाबत व्यवस्थापकीय संचालिका तसेच कार्यकारी संचालक यांनी असे सांगितले की, प्रकल्पाची आखणी तसेच अंबलबजावणी करण्यासाठी जागतिक दर्जाच्या सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून सदर प्रकल्पासाठी जगामधील सर्वोत्तम तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री वापरण्यात येणार आहे. उपस्थित करण्यात आलेल्या सर्व मुद्दयांच्या सखोल अभ्यास करण्यात आला आहे व त्याची सविस्तर अहवाल माहितीसाठी उपलब्ध आहेत.

तसेच सदर मेट्रो प्रकल्प हा भूमीगत असल्यामुळे प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम हे जमिनीखाली किमान २० ते २५ मिटर असणार आहे व त्यामुळे सदर प्रकल्पाचा बांधकामामुळे आजूबाजूचा परिसरात असणाऱ्या इमारतीस कोणताही धोका निर्माण होणार नाही. तसेच प्रकल्प उभारणीचा दरम्यान आजूबाजूचा परिसरातील सर्व इमारतीवर एका विशिष्ट यंत्रप्रणालीद्वारे देखरेख करण्यात येईल.

६) मेट्रो प्रकल्पामध्ये बाधीत इमारतीच्या पुर्नविकास व त्यामध्ये रहिवाशांचे पुनर्वसन करतांना गिरगांव-काळबादेवी मधील सर्व इमारतीचा एकात्मिक पुनर्विकास प्रकल्प व्हावा.

- सदर मुद्दयाबाबत व्यवस्थापकीय संचालिका यांनी असे संबोधीले की, मेट्रो प्रकल्पामध्ये बाधीत होणाऱ्या इमारती व त्यामधील रहिवाशी यांच्या पुनर्वसन व पुनर्विकासासंबंधी उचित कार्यवाही करण्याची कायदेशीर जबाबदारी एमएमआरसीची आहे. त्यानुसार निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

  तथापि मेट्रो प्रकल्पासाठी आवश्यक जागे व्यतिरिक्त गिरगाव-काळबादेवी परिसरातील पुनर्विकासाबाबतचा सार्वजनिक मुद्दा हा केवळ एमएमआरसीच्या अखत्यारीत येत नाही. स्थानिक लोकांनी याबाबत सविस्तर निवेदन दिल्यास ती मुद्दे शासनाकडे जरुर मांडली जातील व शासनाच्या संबंधित विभागास उचित कार्यवाहीची विनंती केली जाईल.

******